बीडचा
लोकप्रश्न
epaper : www.lokprashna.com
अंक १७७ ■ सोमवार, दि.१५ जुलै २०१९ ■ Reg.No.L/Beed/21/2017-2019 RNI Reg. No.MAHN

# आनंदराव धोंडे महाविद्यालयात जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा

कडा : कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात जागतिक तंबाखू विरोधी दिवस व लोकसंख्या दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ.हरिदास विधाते होते. यावेळी प्राचार्य डॉ.हरिदास विधाते यांनी सांगितले की, तंबाखू सेवनामुळे माणसाचे शारीरिक हानी होते. त्याचप्रमाणे आर्थिक नुकसानही होते. दोन्ही गोष्टींचे नुकसान टाळण्यासाठी व्यसनमुक्त राहीले पाहिजे. तसेच त्यांनी लोकसंख्या व माणसांच्या गरजा याबाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ.भगवान वापुले, प्रा.डॉ.भास्कर चव्हाण, प्रा.डॉ.राम बोडखे, प्रा.डॉ.भाऊसाहेब काळे उपस्थित होते. यावेळी प्रा.डॉ.राम बोडखे व इतरांची भाषणे झाली. विद्यार्थी व शिक्षकांना तंबाखू विरोधी शपथ दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.सज्जन गायकवाड यांनी केले. सुत्रसंचलन प्रा.डॉ.रघुनाथ विधाते यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा.शैलजा कुचेकर यांनी मानले.

झुंजार नेता

महाराष्ट्र ■ रविवार दि.१४ जुलै २०१९ ■ R.N.I.NO.16856/68, Postal No - L/29/RNP/ Be

# आनंदराव धोंडे महाविद्यालयात जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा

कडा, दि.१३ (प्रतिनिधी ):- कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात जागतिक तंबाखू विरोधी दिवस व लोकसंख्या दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. हरिदास विधाते होते.

यावेळी प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी सांगितले की, तंबाखू सेवनामुळे माणसाचे शारीरिक हानी होते. त्याचप्रमाणे आर्थिक नुकसानही होते. दोन्ही गोष्टींचे नुकसान टाळण्यासाठी व्यसनमुक्त राहीले पाहिजे. तसेच त्यांनी लोकसंख्या व माणसांच्या गरजा याबाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, प्रा. डॉ. भास्कर चव्हाण, प्रा. डॉ. राम बोडखे,प्रा डॉ. भाऊसाहेब काळे उपस्थित होते. यावेळी प्रा. डॉ. राम बोडखे व इतरांची भाषणे झाली. विद्यार्थी व शिक्षकांना तंबाखू विरोधी शपथ दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सज्जन गायकवाड यांनी केले. सुत्रसंचलन प्रा. डॉ. रघुनाथ विधाते यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. शैलजा कुवेकर यांनी मानले.

# झुंजार नेता

, महाराष्ट्र ■ मंगळवार दि.६ ऑगस्ट २०१९ ■ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Be


# कडा येथे विविध सामाजिक उपक्रमांनी आ.भीमराव धोंडे यांचा वाढदिवस साजरा

कडा, (प्रतिनिधी):- आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आ.भीमराव धोंडे यांचा वाढदिवस कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात विविध सामाजिक उपक्रम राबवित साजरा करण्यात आला.गंगाई फार्मसी महाविद्यालय, आनंदराव धोंडे महाविद्यालय व श्रीराम कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर, मॅरेथॉन स्पर्धा, वृक्षारोपण करण्यात आले. रक्तदान शिबिराचे उद्घाटन विद्यापीठाचे माजी वित्त अधिकारी व परिक्षा नियंत्रक शांतीनाथ टेकाडे यांच्या हस्ते झाले. यावेळी अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. हरिदास विधाते होते. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाचे माजी वित्त अधिक परिक्षा नियंत्रक शांतीनाथ टेकाडे, जनकल्याण रक्तपेढीचे डॉ झेंडे, संस्थेचे संचालक राजाबापु नलावडे,गंगाई फार्मसी कॉलेजचे प्रा. अशोक गदादे, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, सेवानिवृत्त मुख्याध्यापक बबनराव भुकन, बाबासाहेब झगडे, उपप्राचार्य सुभाष गांगर्डे, विकास धर्माधिकारी, युवराज ससाणे, अमोलराजे भुकन, जयंत खंदारे व इतरांची उपस्थिती होती.



जनकल्याण रक्तपेढीचे डॉ. झेंडे यांनी सांगितले की, रक्तदान हे सर्वात मोठे दान आहे, त्यामुळे प्रत्येकाने तीन महिन्यांनंतर रक्तदान करणे गरजेचे आहे. अनेकांना रक्तांची गरज असते. रक्दानामुळे आपल्या रक्तादानातील दोष समजतो.याप्रसंगी शांतीनाथ बनसोडे यांनी सांगितले आ भीमराव धोंडे यांनी या भागाचा सामाजिक, आर्थिक विकास केला,आ. धोंडे हे खरोखरच विकासमहर्षी आहेत. चांगले संस्कार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत. युवकांनी रक्तदानासाठी पुढे आले पाहिजे. यश संपादन करण्यासाठी प्रत्येकाने सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा.

अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी सांगितले की, गेल्या वीस वर्षांपासून आपल्या महाविद्यालयात संस्थापक अध्यक्ष आ. भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर आयोजित करीत आहोत. आ. भीमराव धोंडेयांनी त्यांच्या आयुष्यात अनेक विक्रम केले. त्यांनी एकविसाव्या वर्षी विधानसभा लढविली. पहिल्या वेळी अपयश आले त्यानंतर सलग तीन विधानसभा निवडणुकीत यश संपादन केले. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी वीस वर्षानंतर विजय संपादन करीत गेल्या चार वर्षात मतदारसंघाचा कायापालट केला. एक शांत संयमी असे नेतृत्व आहे. सुत्रसंचलन प्रा. डॉ. रघुनाथ विधाते यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी केले. यावेळी उपप्राचार्य सुभाष गांगुर्डे, गंगाई फार्मसी कॉलेजचे प्रा. अशोक गदादे व इतरांची भाषणे झाली. याप्रसंगी कडा येथील व्यावसायिक जयंत खंदारे व विकास धर्माधिकारी हे गेल्या अनेक वर्षांपासून रक्तदान करतात त्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.संस्थेचे संचालक राजाबापु नलावडे, प्राचार्य डॉ हरिदास विधाते, ॲड. किंबहुने, प्रा डॉ बाळासाहेब धोंडे,प्रा डॉ बापु खैरे,प्रा डॉ भाऊसाहेब काळे,प्रा जिरेकर,प्रा.पटेल व इतरांनी वृक्षारोपण केले.

झुंजार नेता
हाराष्ट्र ■ सोमवार दि.५ ऑगस्ट २०१९ ■ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ Beed/ 2018-20

# आ.धोंडेंचा वाढदिवस; कडा येथे विविध स्पर्धा

कडा, दि.४ ( प्रतिनिधी ):- आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आ.भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय, गंगाई फार्मसी महाविद्यालय व श्रीराम महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर, मॅरेथॉन स्पर्धा, संगीत खुर्ची, रांगोळी स्पर्धा यांचे आयोजन सोमवारी करण्यात आले आहे अशी माहिती संयोजक प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती अशी की,आ. भिमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात गेल्या पंधरा वर्षांपासून रक्तदान शिबीर व मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. गंगाई फार्मसी महाविद्यालय, श्रीराम कनिष्ठ महाविद्यालय व आनंदराव धोंडे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मॅरेथॉन स्पर्धेसाठी रोख बक्षीस, रक्तदान हे सर्वात पवित्र दान आहे, कडा परिसरातील जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करावे, तसेच मॅरेथॉन स्पर्धेत देखील जास्तीत जास्त युवकांनी सहभागी होण्याचे आवाहन प्राचार्य डॉ हरीदास विधाते यांनी केले आहे.

Anandrao Dhonde Alias Babaji College, Kada
LIBRARY

बीड संकेत
www.beedsanket.com
e-mail- bhrbsanket@gmail.com
संपादक-नरेन्द्र कांकरिया
१९ बीड फोन/फॅक्स क्र. (०२४४२) २३०११० R.N.I. No.70487/94 पो.र.नं. एल/१३/एसटीएस/बीड २०१८-



# पुरग्रस्तांच्या मदतीसाठी आ.धोंडे रस्त्यावर

कडा दि.१३ (बातमीदार): गेल्या आठवड्यात कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात पावसाने कहर करीत लाखो नागरिकांना बेघर केले. संपुर्ण महाराष्ट्रातुन मदतीसाठी मोठ्या प्रमाणात सर्व प्रकारची मदत होत यामध्ये आष्टी तालुक्यासारख्या दुष्काळी भागातुन देखील प्रचंड प्रमाणात मदत होत आहे. **कडा** येथे बाजार पेठेत जाऊन पुरग्रस्तांसाठी आ.भीमराव धोंडे यांनी रस्त्यावर उतरून रॅली काढुन पुरग्रस्तांसाठी मदत मागितली.

कडा येथील उद्योजक व टाकळी अमिया गांवचे सरपंच सावता ससाणे यांनी साईनाथ उद्योग समुहाचे वतीने ५ लाख रुपयांची औषधे व ५०० पाणी बॉटलचे बॉक्स दिले आहेत. कडा शहरातील ग्रामस्थ, व्यापाऱ्यांनी देखील भरभरून मदत देत कोल्हापूर व सांगली वासीयांना आधार दिला. याप्रसंगी ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल, डॉ.उमेश गांधी, डॉ.अनिल मुरडे, सचिन पटवा, युवराज ससाणे, सुनिल देशमुख, **डॉ.प्रमोद भळगट,** बाळासाहेब वाघुले, राम ससाणे, सुशिल पटवा, श्रीराम भवर, **शाम** भोजने, अमोलराजे भुकन, प्रा.शाम सांगळे, अमित पटवा, राहुल बलदोटा, शाम भोजने, धनंजय मुथ्था, सुमित भंडारी, गरड, राहुल भोजने यांच्यासह आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.भगवान वाघुले, राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी प्रा.डॉ.भास्कर चव्हाण, प्रा.डॉ.रघुनाथ विधाते, उपप्राचार्य सुभाष गांगर्डे यांच्यासह विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी ग्रामस्थांनी ५६५५५ रुपये तसेच कपडे, **बिस्कीटे व इतर जिवनावश्यक** वस्तु **जमा झाल्याचे सरपंच अनिल ढोबळे यांनी** सांगितले. तसेच आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ११७६० रुपयांची मदत गोळा केली.

साईनाथ उद्योग समुहाचे वतीने अँटीबायोटीक, फंगल **क्रिम,** अॅलर्जिक **औषधे,** खोकल्याची **औषधे,** पित्ताच्या गोळ्या, **पाणी बॉटल अशा मिळुन पाच लाखांचे औषधे व ५०० पाणी बॉटल बॉक्स देण्यात आल्या. सोमवारी सकाळी देखील** कडा शहरातील युवकांनी **कडा गावात मदत फेरी काढुन सर्व प्रकारची मदत गोळा केली.**

## साईनाथ उद्योग समुहाकडून ५ लाखांची औषधे



# झुंजार नेता

बीड, महाराष्ट्र ■ शुक्रवार दि.२३ ऑगस्ट २०१९ ■ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/ B


## कडा येथे युवादुत कार्यशाळा संपन्न

कडा ,दि.२२ (प्रतिनिधी ):- कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात युवा माहिती दुत कार्यशाळा संपन्न झाली. याबाबत अधिक माहिती अशी की, माहिती आणि जनसंपर्क मंत्रालय महाराष्ट्र राज्य यांच्याकडून युवा माहीती दूत निवड करण्यासाठी आनंदराव धोंडे महाविद्यालयात युवा माहिती दुत कार्यशाळा घेण्यात आली. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून आनुलोम सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष किशोर काकडे उपस्थित होते. काकडे यांनी युवा दुताबद्दल सखोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. आर. जी. विधाते हे होते. प्रस्ताविक कार्यक्रमाचे संयोजक प्रा.डॉ. दत्तात्रय नरसाळे यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा.डॉ. भास्कर चव्हाण यांनी मानले. प्रा.किरण कटके यांनी कार्यक्रमासाठी परिस्श्रम घेतले. या प्रसंगी विद्यार्थी-विद्यार्थींनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

झुंजार नेता

, महाराष्ट्र ■ रविवार दि.१ सप्टेंबर २०१९ ■ R.N.I.NO.16856/68, Postal No - L/29/RNP/

# आनंदराव धोंडे महाविद्यालयात फिट इंडिया कार्यक्रम साजरा

कडा ,दि.३१ (प्रतिनिधी):- हॉकी या खेळाचे जादुगर समजले जाणारे मेजर ध्यान यांचा जंन्मदिवस राष्ट्रीय खेळ दिवस म्हणुन साजरा केला जातो निमित्ताने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची देशातील प्रत्येक नागरिक शारीरिक दृष्ट्या फीट रहावा यासाठी आजपासून फिट इंडिया अभियानाला सुरुवात केली आहे. यानिमित्ताने कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांनी - रॅली काढुन १० हजार पावले चालत फिट इंडिया कार्यक्रम साजरा केला.याबाबत अधिक माहिती अशी की,

महाविद्यालयाचा क्रिडा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २९ ऑगस्ट पासुन सुरू केलेल्या 'फिट इंडिया' मोहिमेसाठी यूजीसीने देशातील महाविद्यालयांना या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले होते. कार्यक्रमाचे राष्टीय वाहिनी वरुन प्रक्षेपण करण्यात आले. या कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेपण सकाळी १०.०० ते ११.३० वा. महाविद्यालयातील सभागृहात आयोजन करण्यात आले.

हम सभी देशवासी आज हॉकी केजादुगार मेजर ध्यानचंदजी केजन्मदिवस, जो 'राष्टीय खेल दिवस' केरूप में मनाया जाता हैं, केअवसरपर संपूर्ण स्वास्थ्य प्राप्ती केलिये मन, वचन और कर्म की स्वच्छता आपनाते हुये अपनी दिनचर्या में न्यूनतम ४५ मिनट केशारीरिक अभ्यास, १५ मिनट केध्यानाभ्यास तथा संतुलित आहार ग्राहण करणें कीं शपथ लेते हैं। शपथ ग्राहणानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एच.जी.विधाते यांनी केले.

डॉ. विधाते यांनी शरीर व आरोग्याचे महत्त्व सांगितले. शिवाय यापुढे प्रत्येकवर्षी खेळाडूंच्या विशेष सत्कार आयोजनाची घोषणा केली. याप्रसंगी राष्टीय खेळाडू बाळासाहेब शेंदुरकर हे उपस्थित होते. महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांनी जीवनात खेळाचे महत्व सांगितले. सूत्रसंचालन डॉ. आर. जी.विधाते यांनी तर आभार प्रा.डॉ.भाऊसाहेब काळे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी व विद्यार्थीनी तसेच महाविद्यालयीन शिक्षक व इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुण्य नगरी

शनिवार, ३१ ऑगस्ट २०१९ । लातूर । वर्ष :१५ । अंक : १५१ । पाने १०+४=१४ । किंमत : ५.००

# कडा येथे राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

कडा / प्रतिनिधी : येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण व क्रिडा आणि रा से यो विभागाच्या वतीने मेजर ध्यानचंद यांची जयंती 'राष्ट्रीय क्रिडा दिन' म्हणून साजरा करण्यात आला.

क्रीडा दिनाचे औचित्य साधून 'फिट इंडिया मुव्हमेंट' हा उपक्रम सुरू केला आहे. त्या निमित्ताने सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांना 'फिटनेस शपथ' व १०००० पावले चालून प्रत्यक्ष संदेश देण्यात आला. शपथ ग्रहणानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एच.जी.विधाते यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ.एच.जी. विधाते यांनी शरीर व आरोग्याचे महत्त्व सांगितले. शिवाय यापुढे प्रत्येक वर्षी खेळाडूच्या विशेष सत्कार आयोजनाची घोषणा केली. या प्रसंगी राष्ट्रीय खेळाडू बाळासाहेब शेंदुरकर हे उपस्थित होते. त्यांचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आर. जी.विधाते यांनी तर आभार प्रा. डॉ.भाऊसाहेब काळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी व विद्यार्थिनी तसेच महाविद्यालयीन प्राध्यापक, प्राद्यापिका व इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# झुंजार नेता

राष्ट्र ■ बुधवार दि. २५ सप्टेंबर २०१९ ■ R.N.I.NO.16856/68, Postal No - L/29/RNP/B


## आनंदराव धोंडे महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन साजरा

कडा ( वार्ताहर ):- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिनाचा वर्धापन दिन दिनांक २४ सप्टेंबर रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले होते व प्रमुख पाहुणे म्हणून पाणी फाउंडेशनचे राज्यस्तरीय पारितोषीक मिळवणारे सरपंच प्रा.डॉ.राम बोडखे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमअधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी करताना राष्ट्रीय सेवा योजनेचा संपुर्ण इतिहास सांगितला.

यावेळी प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.राम बोडखे यांनी सांगितले की, महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थींनींनी राष्ट्रीय सेवा योजनेत सतत भाग घेऊन सर्वांगीण विकास साधून सामाजिक सेवाभाव जपण्याचे प्रयत्न करावा. या प्रसंगी प्रा.डॉ. जी.पी. बोडखे, कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.आर.जी.विधाते व विद्यार्थी-विद्यार्थींनींचे समयोचित भाषणे झाली. अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य डॉ.वाघुले यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक या नात्याने स्वावलंबी, चारित्र्य संपन्न, संस्कारक्षम नागरिक होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. राष्ट्रीय आपत्तीमध्ये सहभाग घेऊन देशाची सेवा करावी .सूत्रसंचालन आकाश बोडखे व अश्विनी जिवे तसेच आभार शिवानी धोंडे हिने मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ » TODAY
औरंगाबाद, बुधवार, २५ सप्टेंबर २०१९

# धोंडे महाविद्यालयात 'रासेयो'चा वर्धापनदिन



कडा : आनंदराव धोंडे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना वर्धापनदिनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. राम बोडखे.

कडा, ता. २४ (बातमीदार) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत आनंद चॅरिटेबल संस्था संचलित आनंदराव धोंडे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा वर्धापनदिन मंगळवारी (ता. २४) उत्साहात साजरा करण्यात आला.

अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. भगवानराव वाघुले होते. प्रमुख पाहुणे म्हणून पाणी फाउंडेशनचे राज्यस्तरीय प्रथम पारितोषिक मिळविणारे आनंदवाडीचे सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे, प्रा. डॉ. गोपीनाथ बोडखे उपस्थित होते. प्रा. डॉ. बोडखे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेत सहभाग घेऊन सर्वांगीण विकास साधून सामाजिक सेवाभाव जपण्याचे आवाहन केले. प्रा. डॉ. गोपीनाथ बोडखे व कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रघुनाथ विधाते यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले म्हणाले, की राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक या नात्याने स्वावलंबी, चारित्र्यसंपन्न, संस्कारक्षम नागरिक होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. राष्ट्रीय आपत्तीत सहभाग घेऊन देशाची सेवा करावी. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. स्वयंसेवक आकाश बोडखे व अश्विनी जिवे यांनी सूत्रसंचालन केले. शिवानी धोंडे हिने आभार मानले.

पुण्य नगरी

दि. 25/09/2019

# राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन साजरा



**कडा / प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत आनंदराव धोंडे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. भगवानराव वाघुले तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच प्रा.डॉ.राम बोडखे, प्रा. डॉ.जी.पी.बोडखे उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.राम बोडखे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनींना राष्ट्रीय सेवा योजनेत सतत भाग घेऊन सर्वांगीण विकास साधून सामाजिक सेवाभाव जपण्याचे आवाहन केले. या प्रसंगी प्रा.डॉ. जी.पी. बोडखे व कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.आर.जी.विधाते यांनी विद्यार्थी-विद्यार्थीनी यांना समयोचित मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोप उपप्राचार्य डॉ.वाघुले यांनी केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ.भास्कर चव्हाण यांनी केले, तर सूत्रसंचालन आकाश बोडखे व अश्विनी जिवे यांनी केले आणि आभार शिवानी धोंडे हिने मानले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

Programme Officer
N.S.S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

झुंजार नेता

राष्ट्र ■ शनिवार दि.२८ सप्टेंबर २०१९ ■ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/

# धोंडे महाविद्यालयात एड्स जनजागृती कार्यशाळा संपन्न



कडा, दि.२७ ( प्रतिनिधी ):- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत आनंदराव धोंडे महाविद्यालयांमध्ये रेडरिबन क्लब व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एड्स जनजागृती कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.भास्कर चव्हाण होते व प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा एड्स प्रतिबंद अधिकारी श्रीमती साधना गगांवणे व प्रयोगशाळा तंत्रज्ञ जयचंद नेलवाडे होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे साधना गगांवणे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थींनी यांना एड्सची लक्षणे, उपाय व एड्स होउच नये या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच जयचंद नेलवाडे यानी तपासणी व गुप्तता या विषयी मार्गदर्शन केले . या प्रसंगी कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.आर.जी.विधाते यांनी विद्यार्थी-विद्यार्थीनी यांची समयोचित भाषणे झाली. तसेच अध्यक्षीय समारोपात प्रा.डॉ.चव्हाण यांनी चारिज्य संपन्न, संस्कारक्षम नागरिक होण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे सागिंतले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमअधिकारी प्रा. डॉ. आर.जी. विधाते यांनी सूत्रसंचालन प्रा. श्रीमती शैलजा कुचेकर यांनी व आभार अश्विनी जीवे हिने मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते

। कोल्हापूर । अकोला । गोवा येथून एकाच वेळी प्रकाशित । आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ३७७०७/१९८२ । वर्ष : ३८ अंक : २५६ www.faceboo

# लोकमत

महाराष्ट्राचा मानबिंदू

पृष्ठे : १२+४ = १६, किंमत : ₹ ४.००

औरंगाबाद, शनिवार, दि. २८ सप्टेंबर २०१९

डॉ.बा.आं.म.विद्यापीठांतर्गत महाविद्यालयात रेडरिबन क्लब व रासेयो विभागाचा उपक्रम

## धोंडे कॉलेजमध्ये एड्स जनजागृती कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

आष्टी : डॉ. बा.आं.म.विद्यापीठांतर्गत आनंदराव धोंडे महाविद्यालयात रेडरिबन क्लब व राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत एड्स जनजागृती कार्यशाळा घेण्यात आली.

अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रा. डॉ.भास्कर चव्हाण हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा एड्स प्रतिबंध अधिकारी साधना गंगावणे व प्रयोगशाळा तंत्रज्ञ जयचंद नेलवाडे हे होते.

यावेळी गगांवणे यांनी विद्यार्थी-विद्यार्थिनींना एड्सची लक्षणे, उपाय व एड्स होउच नये या विषयी मार्गदर्शन केले. तसेच नेलवाडे यानी तपासणी व गुप्तता या विषयी मार्गदर्शन केले. या प्रसंगी कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.आर.जी. विधाते यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात प्रा.डॉ. चव्हाण यांनी चारित्र्यसंपन्न, संस्कारक्षम नागरिक होण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे सांगून कार्यशाळेमागील उद्देश यावेळी विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.आर.जी. विधाते, सूत्रसंचालन आकाश बोडखे यांनी केले. आभार अश्विनी हिंगे मानले. कार्यक्रमासाठी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



**आष्टी येथील** आनंदराव धोंडे महाविद्यालयात रेडरिबन क्लब व रासेयो विभागांतर्गत एड्स जनजागृती कार्यशाळा घेण्यात आली. **यावेळी जिल्हा** एड्स प्रतिबंधक अधिकारी साधना गंगावणे यांनी मनोगत व्यक्त केले.

# झुंजार नेता

महाराष्ट्र ■ बुधवार दि.२७ नोव्हेंबर २०१९ ■ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L/29/RNP/


## धोंडे महाविद्यालयाच्यावतीने कडा बसस्थानकात संविधान दिन साजरा



कडा ,दि.२६(प्रतिनिधी ):- कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचा राष्टीय्र सेवा योजना विभागाच्या वतीने कडा येथील बसस्थानकावर संविधान दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व प्राचार्य डॉ.एच.जी.विधाते होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बसस्थानकाचे व्यवस्थापक रमेश भोजणे, बाळासाहेब कर्डिले, उपप्राचार्य डॉ. बी.एम.वाघुले हे उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना करताना प्राचार्य डॉ. विधाते यांनी संविधानाचा इतिहास व संविधानाबद्दल विशेष माहिती सांगून संविधानाचे जनसामान्यासाठी महत्त्व सांगताना देशातील गरीब व श्रीमंत यांचे अधिकार कसे समान आहेत हे सांगितले. आपली राज्यघटना ही धर्म निरपेक्ष आहे. सर्व जाती व धर्माच्या नागरीकांसाठी समान अधिकार आहेत हे या प्रसंगी सांगितले. तसेच राज्यघटनेतील मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्वे व मूलभूत कर्तव्य यावर सविस्तर विवेचन केले. याप्रसंगी सामुहिक संविधान उद्देशीकेचे वाचन करण्यात आले. तसेच चौकातील भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला प्राचार्य डॉ हरिदास विधाते यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक एन एस एस कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.बी. एम. चव्हाण यांनी तर अभार कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. आर. जी. विधाते यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थींनी तसेच प्रवासी, ग्राामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

• औरंगाबाद, बुधवार, २७ नोव्हेंबर २०१९

सकाळ

किंमत ₹ ३ • आजचा अंक : एकूण पाने : पाने १६-१२+४ (टुडे)



कडा : येथील बसस्थानकात संविधान साजरा करताना अधिकारी, चालक-वाहक.

## कडा बसस्थानकात संविधान दिन साजरा

कडा, ता. २६ (बातमीदार) : येथील बसस्थानकात मंगळवारी आनंदराव धोंडे महाविद्यालयात संविधान दिन साजरा झाला. प्राचार्य डॉ. हरिदास विधाते अध्यक्षस्थानी होते. वाहक नियंत्रक रमेश भोजणे, बाळासाहेब कर्डिले, उपप्राचार्य डॉ. बी. एम. वाघुले यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. विधाते यांनी संविधानाचा इतिहास व संविधानाबद्दल विशेष माहिती सांगून संविधानाचे जनसामान्यांसाठी महत्त्व विशद केले. देशातील गरीब व श्रीमंतांचे अधिकार कसे समान आहेत, हे त्यांनी सांगितले. आपली राज्य घटना ही धर्मनिरपेक्ष असून सर्व जातिधर्मांच्या नागरिकांसाठी समान अधिकार असल्याचे ते म्हणाले. या वेळी सामुदायिक संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. प्रा. डॉ. बी. एम. चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. आर. जी. विधाते यांनी आभार मानले.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

झुंजार नेता

, महाराष्ट्र ■ बुधवार दि. १८ डिसेंबर २०१९ ■ R.N.I.NO.16856 /68\, Postal No - L/29/RNP

# आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या वतीने एड्स जनजागृती रॅली

कडा दि.१७ (प्रतिनिधी):-: राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रिबन क्लब आनंदराव धोंडे महाविद्यालय यांच्या वतीने एड्स जनजागृती रली काढण्यात आली होती. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थीनी यांनी घोषणा देत नागरीकांचे लक्ष वेधले, ही रली महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.बी.एम.वाघुले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.एकनाथ हजारे, प्रा.संभाजी ओन्हाळ,डॉ.राम बोडखे. डॉ.गांजुरे , डॉ. भगत उपस्थित होते. या प्रसंगी अध्यक्षस्थानावरून बोलताना उपप्राचार्य डॉ.वाघुले यांनी एड्स विषयी बोलताना सांगितले की, सुंदर व्हा - हुषार व्हा- स्टायलीस व्हा पण स्वतः ला एच.आय.व्ही.पासून वाचवा !असे सांगितले. एड्स विषयीविशेष माहिती सांगून जनमानसात जनजागृती करण्याचे काम विद्यार्थी-विद्यार्थीनी यांनी करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बी. एम. चव्हाण यांनी तर सुत्रसंचालन प्रा.श्रीमती शैलजा कुचेकर व अभार एनएसएस कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.आर.जी.विधाते यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

पार्श्वभूमी

दिनांक १८ डिसेंबर २०१९ बुधवार गंमत भंडारी ई-पेपर : www.parshvbhumi.com L/Beed/52/2015-17 RNI Regd

# आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या वतीने एड्स जनजागृती रॅली



कडा दि.१७ (प्रतिनिधी) :- १४ डिसेंबर रोजी एन. एस. एस. विभाग व रेड रिबन क्लब आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा यांच्या वतीने एड्स जनजागृती रली काढण्यात आली होती. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थीनी यांनी घोषणा देत नागरीकांचे लक्ष वेधले, ही रली महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.बी.एम.वाघुले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.एकनाथ हजारे, प्रा.संभाजी ओव्हाळ,डॉ..राम बोडखे. डॉ.गांजुरे , डॉ. भगत सर हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रसंगी अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना उपप्राचार्य डॉ.वाघुले यांनी एड्स विषयी बोलताना सांगितले की, सुंदर व्हा ! हुषार व्हा ! स्टायलीस व्हा ! पण स्वतः ला एच.आय.व्ही.पासून वाचवा !! असे विद्यार्थी-विद्यार्थीनी यांना सांगितले या कार्यक्रमाचे प्रस्ताविक एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.बी.एम.चव्हाण यांनी तर सुत्रसंचालन प्रा.श्रीमती शैलजा कुचेकर व अभार एनएसएस कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.आर.जी.विधाते यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

राष्ट्रीय युवा दिन सप्ताह दि.14/01/2020

झुंजार नेता

राष्ट्र ■ शनिवार दि. १८ जानेवारी २०२० ■ R.N.I.NO.16856 /68\, Postal No - L/29/RNP/

# विद्यापीठाला डॉ.आंबेडकरांचे नाव दिल्याने विद्यापीठाचा सन्मान वाढला-प्राचार्य विधाते

कडा दि.१७ (प्रतिनिधी): एन.एस.एस.,रेड रिबन क्लब व भूगोल विभाग याच्या संयुक्त विद्यमाने आनंदराव धोंडे महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आर्बेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन, युवा दिन व भूगोल दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परीषदेचे सदस्य प्राचार्य डॉ.एच.जी.विधाते यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अहमदनगर येथील भूगर्भ अभ्यासक प्रदिप नागरगोजे, रा.स्व.से.सघांचे मराठवाडा प्रवक्ते शामभाऊ भोजने, उपप्राचार्य डॉ.बी.एम.वाघुले उपस्थित होते. या कार्यक्रमाचे औचित्य साधुन अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.एच.जी.विधाते यांनी नामविस्तार दिनाची पार्श्वभूमी विषद करुन भूगोलदिना विषयी पर्यावरण व पाणी समस्या या विषयी विद्यार्थी-विद्यार्थीनी यांच्यामध्ये जागृती निर्माण केली. युवा दिनाचे महत्त्व सांगताना विद्यार्थी चारिञ्यसंपन्न व ध्येय साध्य करणारा युवक निर्माण झाला पाहिजे कारण स्वामी विवेकानंद यांचे विचार व सिद्धांत ही भारताची संपत्ती आहे असे सांगितले. प्रमुख पाहुणे यांनी भूगोल दिना विषयी बोलताना पावसाचे पाणी जिरवने किती महत्वाचे आहे हे पटवून दिले. एन.एस.एस.कार्यक्रमाधिकारी व रेड रिबनचे प्रा.डॉ.आर.जी.विधाते यांनी समयोचीत विचार मांडले.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा.डॉ.डी.व्ही.नरसाळे पाटील यांनी व सूत्रसंचालन प्रा.डॉ.एम.जी.राजपंगे आणि अभार श्रीमती. प्रा.डॉ.एम.एस.टेकाडे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.

# झुंजार नेता

मंगळवार दि. २८ जानेवारी २०२० R.N.I.NO.16856 /68\, Postal No - L/29/RNP/


## मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य – नायब तहसीलदार शारदा दळवी

कडा दि.२७ (प्रतिनिधी): मतदान हे राष्टीय कर्तव्य असुन प्रत्येक व्यक्तीने मतदानाचा हक्क बजावला पाहिजे असे प्रतिपादन नायब तहसीलदार शारदा दळवी यांनी कडा येथे केले.कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात दि.२६/०१/२०२० ते १०/०२/२०२० पंधरवाडा आयोजित करण्यात आला आहे दि. २५/०१/२०२० रोजी मतदार दिनाचे महत्त्व सांगून लोकशाहीची शपत घेण्यात आली. मतदार जनजागृती पंधरवाडा निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते होते. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन केले. युवा नेते अजयदादा धोंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. दि.२७/०१/२०२० रोजी राष्टीय सेवा योजना विभागाच्या विभागाच्या मतदार जनजागृती पधंरवाडा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून नायब तहसीलदार शारदा दळवी यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना शारदा दळवी यांनी सांगितले की निवडणूक प्रक्रियेची खरी ओळख भारताचे दिवंगत मुख्य निवडणूक आयुक्त टी.एन.शेषन यांनी करून दिली. निवडणूका निपक्ष वातावरणात व्हाव्यात म्हणून काही नियम व-अटींचे काटेकोर पालन करण्यासाठी नियमावली राबवली. मतदान हे आपले राष्टीय कर्तव्य आहे. हे कर्तव्यच आपणांस सुजान प्रतिनिधी व नागरिक घडवण्यसाठी महत्त्वाचे आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य डॉ हरिदास विधाते यांनी सांगितले की, मतदान करणे हा लोकशाहीचा खरा आत्मा आहे. तेंव्हा आपण मतदान केल्याने आपल्या देशाची लोकशाही बळकट व सुदृढ होण्यासाठी मदत होणार आहे.मतदानाविषयी जनमानसात जनजागृती करण्याचे काम विद्यार्थी-विद्यार्थीनींनी करावे असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बी. एम. चव्हाण यांनी तर सुत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.आर.जी.विधाते यांनी केले व उपस्थितांचे आभार प्रा. श्रीमती शैलजा कुवेकर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी-विद्यार्थीनी, शिक्षक उपस्थित होते.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya.
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.

बीड-महाराष्ट्र

# झुंजार नेता

दिनांक : १ जानेवारी २०२० • वार : बुधवार • पान ३

## धोंडे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीराचे उदघाटन संपन्न

कडा, दि. ३१(प्रतिनिधी): कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष शिबीर आष्टी तालुक्यातील सराटेवडगाव येथे आयोजित करण्यात आले आहे.

या शिबीराचे उदघाटन दि.३१/१२/२०१९ रोजी नायब तहसिलदार प्रदिप पांडूळे यांच्या हस्ते झाले. व प्रमुख पाहुणे महाराष्ट्र सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ता काकडे उपस्थित होते. तसेच या प्रसंगी सरपंच प्रा.डॉ.राम बोडखे, उपसरपंच महादेव शिंदे, बलभीम सुबरे, राजाराम ननवरे, पत्रकार उत्तम बोडखे, बबन सुबरे, ग्रामविकास अधिकारी गोवर्धन सायंबर, तलाठी पोपटराव गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.बाबासाहेब अंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापन परीषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. हरिदास विधाते होते. परीसरातील सर्व ग्रामस्थ विद्यार्थी-विद्यार्थीनी, शिक्षक, यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्तविक कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.भास्कर चव्हाण यांनी तर सुत्रसंचालन प्रा.डॉ.रघुनाथ विधाते यांनी व आभार प्रा.डॉ.दत्ता नरसाळे यांनी मानले.

PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji College
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

झुंजार नेता

राष्ट्र ■ मंगळवार दि. ७ जानेवारी २०२० ■ R.N.I.NO.16856 /68\, Postal No - L/29/RNP/ E

# युवक हाच खरा विकासाचा मार्ग - डॉ. पाटील

कडा दि. ६ (प्रतिनिधी) - आजचा तरुण हाच खरा विकासाचा मार्ग आहे. राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या माध्यमातून युवकांनी ग्रामीण भागाच्या विकासासाठी पुढे यावे असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. आर. पाटील यांनी केले. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास राष्ट्रीय सेवा योजना शिबीरातुन होतो. हे शिबीर म्हणजे एक संस्कारांची ज्योत आहे असे प्रतिपादन तालुका कृषी अधिकारी राजेंद सुपेकर यांनी आष्टी तालुक्यातील सराटेवडगांव येथे केले.डॉ. बाबासांहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. हरिदास विधाते होते. व्यासपीठावर तालुका कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, सरपंच डॉ. राम बोडखे, ग्रा. पं. सदस्य नबी शेख, उपसरपंच महादेव शिंदे, विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त स्वयंसेवक सचिन ढोले, बाळकृष्ण तरटे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. पाटील यांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजना ही चार भिंतींच्या बाहेरची शाळा आहे. एकदा यश मिळाले तर यश मिळतेच राहते. विद्यापिठाच्या उन्नत भारत योजनेत या गावाचा समावेश केला जाईल. विद्यापिठाच्या ८२ शिबिरार्थी युवकांनी कोल्हापूर जिल्ह्यातील कुरूंदवाड येथे महापुर कालावधीत मोठे काम केले आहे. युवकांनी शिबीरातुन चांगले संस्कार घेऊन आई वडीलांचे स्वप्न पुर्ण करावे. शिबिरार्थिंनी सराटेवडगांव येथे केलेले काम कौतुकास्पद आहे. विद्यापिठाचे विद्यार्थी ग्रामीण भागात जाऊन चांगले काम करतात. हेमराज माळी व आकाश बोडखे या दोघां शिबीरार्थींची रायगड व वर्धा येथे होणार्या राज्यस्तरीय शिबिरासाठी निवड झाल्याचे डॉ. पाटील यांनी यावेळी सांगितले. महाविद्यालयाने शिबिराचे माध्यमातून चांगली विकास कामे केली. प्राध्यापकांनी यापुढे अध्यापनाबरोबरच गावात जाऊन सामाजिक कार्य करावे. आजचा तरुण हाच खरा विकासाचा मार्ग आहे असेही डॉ. पाटील यांनी सांगितले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना आष्टी तालुका कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर यांनी सांगितले की, मी राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी आहे. शिबीरातुन संभाषण कौशल्य मिळते, कार्यक्रमाचे नियोजन कसे करावे याची माहिती मिळते.



विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास राष्ट्रीय सेवा योजना शिबीरातुन होतो. हे शिबीर म्हणजे एक संस्कारांची ज्योत आहे. एकमेकांना नावे ठेवण्यापेक्षा आपण ज्या क्षेत्रात काम करतो ते प्रामाणिकपणे करा. आपल्याला काय व्हायचे आहे ते वेळेत ठरवा तरच ते विद्यार्थी जिवनात यशस्वी होतात. बौद्धिक पातळीतुन स्वतःची ओळख निर्माण करा

झुंजार नेता

दिनांक : ०५ जानेवारी २०२० वार: रविवार • पान ३

# राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रक्त तपासणी

कडा दि.४ (प्रतिनिधी): राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रिबन क्लब आनंदराव धोंडे महाविद्यालय कडा यांच्या वतीने एड्स जनजागृती व तपासणी शिबीर सराटेवडगाव येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थीनी, ग्रामस्थांनी रक्त तपासणी करून घेतले. या उपक्रमासाठी आष्टी ग्रामीण रुग्णालयातील जयचंद नेलवडे व श्रीमती सुजाता दहिफळे या उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राजाराम ननवरे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच डॉ. राम बोडखे. डॉ. जी. पी. बोडखे, डॉ. सांगळे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रसंगी मार्गदर्शन करताना जयचंद नेलावडे यांनी एड्स विषयी विद्यार्थी-विद्यार्थीनी एड्स विषयी माहिती सांगून जनमानसात जनजामृती करण्याचे काम विद्यार्थी-विद्यार्थीनी यांनी करण्याचे आवाहन केले. एड्स हा संसर्गजन्य नाही त्यामुळे आपण एड्सग्रास्तांना माणूसकीची वागणूक दिली पाहिजे.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.बी.एम.चव्हाण यांनी तर सुत्रसंचालन प्रा.श्रीमती शैलजा कुंवेकर व आभार कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.आर.जी.विधाते यांनी मानले.

# चंपावतीपत्र

बीड | वर्ष ५४ वे । अंक ३३७ | R.N.I. Regd No.

मंगळवार, दि.०७ जानेवारी २०२० । पाने ८। किंमत रु.२ | www.champavateepatra.in | champava.e...@gmail.com



Dhonde Alias Bapuji Jr. College LIBRARY


## ...शेख शोहेबची निवड



...टेनमेंट महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन अंतर्गत घेण्यात आलेल्या निवड चाचणीत माजलगाव येथील तरुण क्रिकेट अकॅडमीचा खेळाडु शेख शोहेब हाय्युम पिंजारी याने खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन केल्याने याची बीड जिल्हा क्रिकेट संघात निवड

## युवक हाच खरा विकासाचा मार्ग-डॉ.टी.आर.पाटील

आष्टी । वार्ताहर

आजचा तरुण हाच खरा विकासाचा मार्ग आहे, राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या माध्यमातून युवकांनी ग्रामीण भागाच्या विकासासाठी पुढे यावे असे प्रतिपादन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. आर. पाटील यांनी आष्टी तालुक्यातील सराटेवडगांव येथे केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या समारोप प्रसंगी



ते बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. हरिदास विधाते होते. व्यासपीठावर तालुका कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, सरपंच डॉ. राम बोडखे, ग्रा. पं. सदस्य नबी शेख, उपसरपंच महादेव शिंदे, विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त स्वयंसेवक सचिन ढोले, बाळकृष्ण तरटे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. पाटील यांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजना ही चार भिंतींच्या बाहेरची शाळा आहे. एकदा यश मिळाले तर यश मिळतेच राहते. विद्यापिठाच्या उन्नत भारत योजनेत या गावाचा समावेश केला जाईल. विद्यापिठाच्या ८२ शिबिरार्थी युवकांनी कोल्हापूर जिल्ह्यातील कुरुंदवाड येथे महापुर कालावधीत मोठे काम केले आहे. युवकांनी शिबीरातुन चांगले संस्कार घेऊन आई वडीलांचे स्वप्न पुर्ण करावे. शिबिरार्थींनी सराटेवडगांव येथे केलेले काम कौतुकास्पद आहे. विद्यापिठाचे विद्यार्थी ग्रामीण भागात जाऊन चांगले काम करतात. हेमराज माळी व आकाश बोडखे या दोघां शिबीरार्थींची रायगड व वर्धा येथे होणाया


पान ७ वर


गटविकास अधिकारी राजेंद्र बागडे तालुकाध्यक्ष डॉ. मधुसूदन खेडकर ज्येष्ठ
नेते दशरथ दादा वनवे माजी जिप उपाध्यक्ष शिवाजीराव पंडे राजाभाऊ जाधव
प्राचार्य डॉ. नामदेवराव सानप सर सतीश काटे निवृत्ती बेद्रे रेखाताई जरांगे सुवर्णा
चौधरी सुभाष शिरसागर उपस्थित होते आपल्या सत्काराला उत्तर देताना
सभापती सौ उषा सर्वदे व उपसभापती जालिंदर सानप यांनी पंचायत समिती
द्वारे ग्रामीण विकास गतिमान करू अशी ग्वाही दिली व जनसामान्याच्या
दारापर्यंत विकास योजना पोहोचण्याची हमी दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष भाजपा
जिल्हाध्यक्ष रमेश पोकळे आपल्या भाषणात म्हणाले की नवनिर्वाचित
पदाधिकाऱ्यांना ग्रामीण विकासाची व शिरूरकासार तालुक्याचे जे स्वप्न ज्येष्ठ
नेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबानी पाहिले ते पूर्ण करण्याची संधी प्राप्त झाली
आहे त्यासाठी प्रयत्न करावेत समाजाचे उपकार फेडले तर लोकप्रतिनिधींची
प्रगती होते भविष्यात सार्वजनिक क्षेत्रात प्रामाणिकपणे आणि निष्ठेने कार्य
करण्याची गरज आहे असे मत व्यक्त करून पदाधिकाऱ्याना शुभेच्छा दिल्या.
तहसीलदार श्री श्रीराम बेडे ज्येष्ठ नेते दशरथ दादा वनवे यांनी आपले मनोगत
व्यक्त केले उपस्थित सर्व मान्यवराचा आणि नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा
सत्कार पंचायत समिती प्रशासनाद्वारे करण्यात आला नवनिर्वाचित
पदाधिकाऱ्यांचा विविध गावच्या सरपंचानी व ग्रामसेवकानी वाहतू संघटना यांनी
सत्कार केला या कार्यक्रमास उपसरपंच मुराद पठाण, राजा भाऊ जाधव,
निजाम तांबोळी, गणेश सानप भगवानराव सानप, रवींद्र कोकणे भागवत सानप,
सुरेश जाधव चंद्रभान डोळे देवा गरकळ चंदू कुलकर्णी, सुलेमान पठाण नूर टेलर
एम एन बडे प्रभाकर सानप माऊली सानप हरी मामा खेडकर विजय सरवदे
प्रकाशराव झगळे आयुब शेख सह आदी गावचे पंचायत समिती सदस्य सरपंच
चेअरमन नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री
जायभाये यांनी केले तर शेवटी आभार सूत्रसंचालन देविदास बडे यांनी मानले.

लोकमत
हॅलो बीड
औरंगाबाद, बुधवार, दि. ८ जानेवारी २०२०

# सराटे वडगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कडा :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आष्टी तालुक्यातील सराटे वडगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर पार पडले.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. हरिदास विधाते होते. व्यासपीठावर तालुका कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, सरपंच डॉ. राम बोडखे, प्रा. पं. सदस्य नबी शेख, उपसरपंच महादेव शिंदे, विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त स्वयंसेवक सचिन ढोले, बाळकृष्ण तरटे यांची उपस्थिती होती.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना आष्टी तालुका कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षपदावरुन बोलताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी श्रमाची महती विद्यार्थ्यांना पटवून दिली. प्रास्ताविकातून कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी शिबीर कालावधीत सराटेवडगावात युवकांनी श्रमदानातून केलेल्या विविध कामांचा आढावा घेतला.



कामाची पाहणी करताना कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर, प्रा. डॉ पाटील, प्राचार्य डॉ हरिदास विधाते.

याप्रसंगी सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे, यांनी मनोगत व्यक्त केले. सचिन ढोले, प्रा. शैलजा कुचेकर, प्रवीण आटोळे, आकाश बोडखे, रोहित वाघमारे, अश्विनी जिवे, वैष्णव नरवडे, उत्कर्षा कन्हेरकर यांची यावेळी भाषणे झाली.

यावेळी बेस्ट विद्यार्थी म्हणुन आकाश बोडखे, हेमराज माळी गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. रघुनाथ विधाते व प्रा. शैलजा कुचेकर यांनी केले. सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा. डॉ. दत्तात्रय नरसाळे यांनी मानले.

Charan. ...

www.epunyanagari.com

Toll Free 9773927928

# पुण्य नगरी

नेवारी २०२० । वर्ष : १५ । अंक : २७८ । पाने १२+४=१६ ★ किंमत : ₹ ५.०० सोने : 37,800 ◆ चांदी : 48,770

## युवकांनी ग्रामीण भागाच्या विकासासाठी पुढे यावे : पाटील



**कडा / प्रतिनिधी :** आजचा तरुण हाच खरा विकासाचा मार्ग आहे, राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून युवकांनी ग्रामीण भागाच्या विकासासाठी पुढे यावे असे प्रतिपादन डॉ. टी. आर. पाटील यांनी केले.

आष्टी तालुक्यातील सराटेवडगाव आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, व्यासपीठावर तालुका कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, सरपंच डॉ. राम बोडखे, नबी शेख, उपसरपंच महादेव शिंदे, सचिन ढोले, बाळकृष्ण तरटे सह आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. पाटील म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना ही चार भिंतींच्या बाहेरची शाळा आहे. एकदा यश मिळाले तर यश मिळतेच राहते. विद्यापीठाच्या उन्नत भारत योजनेत या गावाचा समावेश केला जाईल. विद्यापीठाच्या ८२ शिबिरार्थी युवकांनी कोल्हापूर जिल्ह्यातील कुरुंदवाड येथे महापूर कालावधीत मोठे काम केले. युवकांनी शिबिरातून चांगले संस्कार घेऊन आई वडीलांचे स्वप्न पूर्ण करावे. विद्यापीठाचे विद्यार्थी ग्रामीण भागात जाऊन चांगले काम करतात. हेमराज माळी व आकाश बोडखे या दोघा शिबिरार्थींची रायगड व वर्धा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शिबिरासाठी निवड झाल्याचे डॉ. पाटील यांनी यावेळी सांगितले. यावेळी इतर मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी सचिन ढोले, प्रा. शैलजा कुचेकर, प्रविण आटोळे, आकाश बोडखे, रोहित वाघमारे, आश्विनी जिवे, वैष्णव नरवडे, उत्कर्षा कन्हेरकरसह आदी उपस्थित होते. यावेळी शिबिरातील बेस्ट विद्यार्थी म्हणून आकाश बोडखे, हेमराज माळी गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. रघुनाथ विधाते व प्रा. शैलजा कुचेकर यांनी केले. आभार प्रा. डॉ. दत्तात्रय नरसाळे यांनी मानले.

बीडचा
लोकप्रश्न
epaper : www.lokprashna.com
अंक ३४७ ■ बुधवार, दि.८ जानेवारी २०२० ■ Reg.No.L/83/RNP/Beed/2020-2022 RNI Reg. No.MAHMAR/20

Chavan · Sir

# युवक हाच खरा विकासाचा मार्ग-डॉ.पाटील

**कडा । वार्ताहर**

आजचा तरुण हाच खरा विकासाचा मार्ग आहे, राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या माध्यमातून युवकांनी ग्रामीण भागाच्या विकासासाठी पुढे यावे असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. आर. पाटील यांनी आष्टी तालुक्यातील सराटेवडगांव येथे केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. हरिदास विधाते होते. व्यासपीठावर तालुका कृषी अधिकारी



राजेंद्र सुपेकर, उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, सरपंच डॉ. राम बोडखे, ग्रा. पं. सदस्य नबी शेख, उपसरपंच महादेव शिंदे, विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त स्वयंसेवक सचिन ढोले, बाळकृष्ण तरटे यांची उपस्थिती होती. डॉ. पाटील यांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजना ही चार भिंतींच्या बाहेरची शाळा आहे. एकदा यश मिळाले तर यश मिळतेच राहते. विद्यापिठाच्या उन्नत भारत योजनेत या गावाचा समावेश केला जाईल. विद्यापिठाच्या ८२ शिबिरार्थी युवकांनी कोल्हापूर जिल्ह्यातील कुरुंदवाड येथे महापुर कालावधीत मोठे काम केले आहे. युवकांनी शिबीरातुन चांगले संस्कार घेऊन आई वडीलांचे स्वप्न पुर्ण करावे. शिबिरार्थींनी सराटेवडगांव येथे केलेले काम कौतुकास्पद आहे. विद्यापिठाचे विद्यार्थी ग्रामीण भागात जाऊन चांगले काम करतात. हेमराज माळी व आकाश बोडखे या दोघां शिबीरार्थींची रायगड व वर्धा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शिबिरासाठी निवड झाल्याचे डॉ. पाटील यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यानी शिबिर कालावधीत सराटेवडगावात युवकांनी श्रमदानातून केलेल्या विविध कामांचा आढावा घेतला. याप्रसंगी सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे यांनी सांगितले. गावातील चांगल्या कामामुळे सराटेवडगाव आनंदवाडी ही गावे राज्यात नावलौकिक झाले आहे. यासाठी ग्रामस्थांचा सहभाग व सहकार्य केले. कृषी अधिकारी राजेंद्र सुपेकर यांनी गावातील शेततळ्यासाठी मोलाचे सहकार्य केले. यावेळी विद्यापीठाचे रासेयोचे स्वयंसेवक सचिन ढोले, प्रा. शैलजा कुचेकर, शिबिरार्थी प्रविणआटोळे, आकाश बोडखे,रोहित वाघमारे,आश्विनी जिवे, वैष्णव सवडे, उत्कर्षा कन्हेरकर व इतरांची भाषणे झाली. यावेळी शिबिरातील बेस्ट विद्यार्थी म्हणुन आकाश बोडखे, हेमराज माळी गौरव करण्यात आला. सुत्रसंचलन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रघुनाथ विधाते व प्रा. शैलजा कुचेकर यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. दत्तात्रय नरसाळे यांनी मानले. कार्यक्रमास शिबिरार्थी युवक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# झुंजार नेता

. महाराष्ट्र ■ शनिवार दि. ४ मे २०१९ ■ R.N.I.NO.16856/68, Postal No - L/29/RNP/ Bee


## पाणी फाऊंडेशन शिबीरात धोंडे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे श्रमदान

कडा, दि.३ (प्रतिनिधी):- आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून समाजासाठी काहीतरी करावे हा हेतु समोर ठेवून नेहमीच सामाजिक कार्यात आघाडी तालुक्यात अग्रेसर असणाऱ्या कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाने महाराष्ट्र दिनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाने दत्तक घेतलेल्या सराटेवडगाव येथे सुरू असलेल्या पानी फाऊंडेशनच्या कामाला प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थ्यांनी श्रमदान करून मदतीचा हात दिला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सिनेअभिनेते अमिर खान यांच्या संकल्पनेतून पुढे आलेल्या सत्यमेव जयते कार्यक्रमाअंतर्गत पानी फाऊंडेशन वॉटर कप स्पर्धा २०१९ संपुर्ण महाराष्ट्रात सुरू आहे. गावागावांत नागरिक रात्री व सकाळी श्रमदान करून कायमचा पाणी प्रश्न सुटावा यासाठी प्रयत्न करीत आहेत. या कामांकरिता



ग्रामस्थांसोबत श्रमदान करण्यासाठी विविध क्षेत्रातील व प्रतिष्ठीत नागरिक सहभागी होऊन श्रमदान करीत आहेत. गतवर्षी पाणी फाऊंडेशनचे वॉटर कप स्पर्धेत राज्यात तृतीय क्रमांक मिळविलेल्या आनंदवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे यांनी यावेळी सराटेवडगाव या गावाला बक्षिस मिळवुन देण्यासाठी विडा उचलला आहे. युवकांचे संघटन करीत गावातील महिला, ग्रामस्थ व युवकांना सोबत घेऊन सरपंच राम बोडखे रात्रंदिवस श्रमदान करीत आहेत. १ मे हा कामगार दिन, या दिनाच्या निमित्ताने कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असलो तरी एक कामगार म्हणुन श्रमदान करणे आवश्यक आहे. कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने सराटेवडगांव आनंदवाडी हे गाव दत्तक घेतले आहे. प्राचार्य डॉ. एच.जी.विधाते, उपप्राचार्य डॉ भगवान वाघुले, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण, प्रा. डॉ. बापु खैरे, प्रा डॉ विजय पोकळे, प्रा. डॉ. गोपीनाथ बोडखे व महाविद्यालयातील इतर प्राध्यापक आणि एन. एन. एस.चे स्वयंसेवकांनी श्रमदान केले.



# शिक्षकांच्या हातात खडु-डस्टरऐवजी खोरे-घमेले-टिकाव; तीन तास केले श्रमदान

**कडा, (वार्ताहर)** : वर्षभर हातात खडू डस्टर घेऊन विद्यार्थ्यांसमोर फळ्यावर लिहून ज्ञानार्जन करणाऱ्या नाजूक हातात सराटेवडगाव येथे सत्यमेव जयते पाणी फाउंडेशनच्या श्रमदानाच्या कार्यक्रमात शिक्षकांनी चक्क हातात टिकाव, खोरे, घमिले घेऊन सुमारे तीन तास श्रमदान केले.

याबाबत अधिक माहिती अशी की अभिनेते आमीर खान यांच्या संकल्पनेतून पुढे आलेल्या सत्यमेव जयते पाणी फाउंडेशन वॉटर कप स्पर्धा सध्या संपूर्ण महाराष्ट्रात सुरु आहे. प्रत्येक तालुक्यातील अनेक गावांनी या स्पर्धेत भाग घेतला आहे. रात्री व सकाळी गावातील महिला, पुरुष, जेष्ठ नागरिक, बालक, मुले श्रमदान करीत आहेत. सध्या सुट्टी असल्यामुळे शाळेतील मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी या कामात चांगलीच गुंतले आहेत. आपले गाव पाणीदार करण्यासाठी सर्व प्रकारचे मतभेद विसरून ग्रामस्थ श्रमदान करीत आहेत. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी व आपल्या गावाची पाणी समस्या कायमची सोडवण्यासाठी आष्टी तालुक्यातील अनेक गावांमध्ये सध्या पाणी फाउंडेशनचे काम चालू आहे. यामध्ये विशेष करून सराटेवडगाव येथे हे काम जोरात सुरू आहे. सरपंच प्रा. राम बोडखे यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील युवक, महिला, युवती, शाळेतील मुले व बालक, आबालवृद्ध सध्या दररोज सकाळी व संध्याकाळी शेतात जाऊन श्रमदान करीत आहेत. बांधबंदिस्ती, चर खोदणे इत्यादी जलसंधारणाची कामे करत आहेत. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून आष्टी तालुक्यातील [illegible] धोंडे महाविद्यालय, धानोरा [illegible] विद्यालय तसेच [illegible] जाऊन हातात खोरे, घमिले व टिकाव घेऊन श्रमदान केले.

काही शिक्षकांनी हातात टिकाव घेऊन जमीन खोदली तर अनेक जण माती भरून देण्याचे काम करीत होते व काही जण मातीचा भराव घालण्याचे काम करीत होते. सकाळी उन्हाचा चटका होता. डोक्याला गमजा बांधून, डोक्यात टोपी घालून शिक्षक श्रमदान करताना दिसत होते, तर गावातील ज्येष्ठ नागरिक दमलेल्या शिक्षकांना ग्लासभर पाणी पिण्यास देत होते. ढोल ताशाच्या गजरात शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात श्रमदान केले. शिक्षक जरी शेतकऱ्यांची मुले असली तरी त्यांना ज्यादा कष्टाची सवय नसल्याने ते घामाघुम झाले होते.

आमदार भीमराव धोंडे यांनी शिक्षक व ग्रामस्थ सोबत श्रमदान केले. त्याच्यासोबत केंद्रप्रमुख सुरेश मिरगणे, दिव्यांग शिक्षक नेते आदर्श शिक्षक, सिद्धेश्वर शेंडगे, राजेंद्र लाड, मुख्याध्यापक सुरेश बोडखे, पैलवान बाळासाहेब शेंदुरकर, तसेच उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण, सहायक प्रा. डॉ. रघुनाथ विधाते, धानोरा येथील प्राचार्य डॉ. कैलास वायभासे यांच्यासह जवळपास ७० ते ८० शिक्षकांनी तीन तास श्रमदान करून सराटेवडगावच्या पाणी फाउंडेशन वॉटर कप स्पर्धेत सहभाग नोंदवला.

# झुंजार नेता

, महाराष्ट्र ■ मंगळवार दि. १४ मे २०१९ ■ R.N.I.NO.16856/68, Postal No - L/29/RNP/ Bee


## शिक्षकांच्या हातात खडु - डस्टर ऐवजी खोरे- घमिले आणि टिकाव; तीन तास केले श्रमदान

कडा, दि.१३ (प्रतिनिधी):- वर्षभर हातात खडू डस्टर घेऊन विद्यार्थ्यासमोर फळ्यावर लिहून ज्ञानार्जन करणाऱ्या नाजूक हातात सराटेवडगाव येथे सत्यमेव जयते पाणी फाऊंडेशनच्या श्रमदानाच्या कार्यक्रमात शिक्षकांनी चक्क हातात टिकाव, खोरे, घमिले घेऊन सुमारे तीन तास श्रमदान केले.

याबाबत अधिक माहिती अशी की अभिनेते आमिर खान यांच्या संकल्पनेतून पुढे आलेल्या सत्यमेव जयते पाणी फाउंडेशन वॉटर कप स्पर्धा सध्या संपूर्ण महाराष्टात सुरु आहे, प्रत्येक तालुक्यातील अनेक गावांनी या स्पर्धेत भाग घेतला आहे. रात्री व सकाळी गावातील महिला, पुरुष, जेष्ठ नागरिक, बालक, मुले श्रमदान करीत आहेत. सध्या सुट्टी असल्यामुळे शाळेतील मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी या कामात चांगलीच गुंतले आहेत. आपले गाव पाणीदार करण्यासाठी सर्व प्रकारचे मतभेद विसरून ग्रामस्थ श्रमदान करीत आहेत. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी व आपल्या गावाची पाणी समस्या कायमची सोडवण्यासाठी आष्टी तालुक्यातील अनेक गावांमध्ये सध्या पाणी फाऊंडेशनचे काम चालू आहे. यामध्ये विशेष करून सराटेवडगाव येथे हे काम जोरात सुरू आहे. सरपंच प्रा. राम बोडखे यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील युवक, महिला, युवती, शाळेतील मुले व बालक, आबालवृद्ध सध्या दररोज सकाळी व संध्याकाळी शेतात जाऊन श्रमदान करीत आहेत. बांधबंदिस्ती, चर खोदणे इत्यादी जलसंधारणाची कामे करत आहेत. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून आष्टी तालुक्यातील कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय, धानोरा येथील कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय तसेच महेश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रुई नालकोल या शाळेतील शिक्षकांनी सराटेवडगाव येथे जाऊन हातात खोरे, घमिले व टिकाव घेऊन श्रमदान केले. काही शिक्षकांनी हातात टिकाव घेऊन जमीन खोदली तर अनेक जण माती भरून देण्याचे काम करीत होते व काही जण मातीचा भराव घालण्याचे काम करीत होते. सकाळी उन्हाचा चटका होता. डोक्याला गमजा बांधुन, डोक्यात टोपी घालून शिक्षक श्रमदान करताना दिसत होते, तर गावातील ज्येष्ठ नागरिक दमलेल्या शिक्षकांना ग्लासभर पाणी पिण्यास देत होते. ढोल ताशाच्या गजरात शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात श्रमदान केले. शिक्षक जरी शेतकऱ्यांची मुले असली तरी त्यांना ज्यादा कष्टाची सवय नसल्याने ते घामाघुम झाले होते. यावेळी लोकप्रिय आमदार भीमराव धोंडे यांनी शिक्षक व ग्रामस्थ सोबत श्रमदान केले. त्याच्यासोबत केंद्रप्रमुख सुरेश मिरगणे, दिव्यांग शिक्षक नेते आदर्श शिक्षक, सिद्धेश्वर शेंडगे, राजेंद्र लाड, मुख्याध्यापक सुरेश बोडखे, पैलवान बाळासाहेब शेंदुरकर, तसेच उपप्राचार्य डॉ. भगवान वाघले, आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे राष्टीय सेवा योजना अधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण, सहायक प्रा. डॉ. रघुनाथ विधाते, प्रा डॉ गोरक्ष पठारे, प्रा डॉ अशोक माळशिखरे, चेअरमन प्रा. डॉ शाम सांगळे, प्रा. संभाजी ओव्हाळ, प्रा डॉ बाळासाहेब धोंडे, प्रा किरण कटके, प्रा डॉ पंडीत औटे, प्रा डॉ नरसाळे, फिरोज शेख, प्रा सुभाष गांगर्डे, प्रा राजेंद्र डांगे, प्रा चौधरी, प्रा डॉ सुभाष नागरगोजे, प्रा भीमराज गावडे, प्रा. डॉ गोपीनाथ बोडखे, प्रा डॉ विजय पोकळे, वाघ के डी, रविंद्र माळशिखरे, धानोरा येथील प्राचार्य डॉ. कैलास वायभासे यांच्या सह जवळपास ७० ते ८० शिक्षकांनी तीन तास श्रमदान करून सराटेवडगावच्या पाणी फाउंडेशन वॉटर कप स्पर्धेत सहभाग नोंदवला.

